bluebytes
news that matters

सकाळ

Tuesday, May 11, 2010

**Willpower needed to quit smoking**

Publication: Sakal, Edition: Mumbai, Journalist: Bureau, Page No: 3, Location: Top-Center, Width(cms): 25, Height(cms): 6, Size(sq.cms): 150

# सिगारेट सोडण्यासाठी इच्छाशक्ती महत्त्वाची

## धूम्रपान आणि उत्पत्तीविज्ञानाचा संबंध उघड

सकाळ वृत्तसेवा

मुंबई, ता. १० : सिगारेट सोडण्यासाठी इच्छाशक्ती अधिक महत्त्वाची असते, या व्यसनापासून मुक्ती मिळवण्याची इच्छा असेल, तर ती व्यक्ती या व्यसनातून पूर्णपणे बाहेर पडू शकते, असे संशोधनातून सिद्ध झाले आहे; मात्र धूम्रपान आणि उत्पत्तीविज्ञानाचा जवळचा संबंध असल्याचे संशोधकांनी एका वैज्ञानिक मासिकामध्ये प्रसिद्ध केले आहे. त्यामुळे सिगारेट सोडणाऱ्यांची मानसिकता बदलू शकते, असे मत हेलिस-सेखसारिया इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ या तंबाखूविरोधी गटाचे म्हणणे आहे. 'नेचर जेनेटिक्स' या मासिकामध्ये प्रसिद्ध झालेल्या अनुक्रमे तीन अभ्यासांमध्ये १,४०,००० हून अधिक लोकांच्या डीएनएची तुलना केल्यानंतर त्यात धूम्रपान सोडण्याचा संबंध हा इच्छाशक्तीपेक्षा उत्पत्तीशास्त्राशी अधिक असल्याचे दिसून आले आहे. या संशोधनामध्ये दोन गुणसूत्रांचे परस्परांवरील अवलंबित्व आणि त्यांचे शरीरातील कार्य यांच्यातील संबंध तपासण्यात आला असता त्यात धूम्रपान करणाऱ्या व्यक्तींमध्ये एका विशिष्ट प्रकारचे गुणसूत्र अधिक दिसले आहे. मेट्रोपोलिस हेल्थकेअर लिमिटेडमधील जेनेटिक तज्ज्ञ डॉ. विद्या साळसकर यांच्या म्हणण्यानुसार सिगारेटमध्ये निकोटीन असते. बऱ्याच काळानंतर हे निकोटीन शरीरातील गुणसूत्रांवर परिणाम करते. त्यामुळे धूम्रपान करणाऱ्या पालकांकडून हे गुणसूत्र मुलांपर्यंत पोहचते. ही मुले अनेकदा इतर मुलांपेक्षा लवकर अधिक प्रमाणात धूम्रपान करू लागतात; मात्र धूम्रपान सोडण्याच्या क्षमतेमध्ये गुणसूत्रे ही अत्यल्प भूमिका बजावतात, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.